# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**6 JULY, 2018**

[Time : 14-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - I**

**(Time Allowed : 1 Hour)**

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - १**

(वेळ : १ तास)

---

**प्र.1)** खालील व्यापारी पत्र आकर्षक रीतीने टंकलिखित करा : **[गुण : ३०]**

**विशाल ॲण्ड सन्स**

४५, यादव मार्ग, मार्केट यार्ड इमारत,

मार्केट यार्ड, पुणे

जावक क्रमांक : विकं/८७६/१२ दिनांक : [आजचा टाका]

प्रति,

मयूरी ट्रेडर्स,

मोरेश्वर मार्ग, गंज पेठ,

पुणे - ४११ ००९

विषय : लेखनसाहित्याच्या विक्रीबाबत.

संदर्भ : आपले पत्र क्रमांक ८३७...

महोदय,

आपले पत्र मिळाले. लेखनसाहित्याची यादी व दरपत्रक सोबत पाठवीत आहोत. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारचे कागद व अन्य साहित्याचे काही आकर्षक नमुनेही सोबत पाठवीत आहोत. सदर वस्तू आपण आपल्या ग्राहकांच्या निदर्शनास आणल्यास आपली विक्री वाढेल याची आम्हाला खात्री आहे व एकदा सदर वस्तू ग्राहकांच्या पसंतीस उतरल्या तर आपले व्यापारी संबंध वाढतील व आम्ही आपणांस व्यापारी सूट देण्याचाही विचार करू.

आपण दहा हजार रुपयांहून अधिक किमतीच्या मालाची मागणी केल्यास आम्ही आपणांस उधारीवर माल देऊ शकू. तसेच आपल्या रोख व्यवहारात ३ टक्के सूट देण्याचे आम्ही आपणांस आश्वासन देत आहोत.

तरी आपण लवकरात लवकर योग्य तो पत्रव्यवहार करावा ही विनंती.

आपला विश्वासू,

पार्टनर,
विशाल ॲण्ड सन्सकरिता

सोबत : दरपत्रके व नमुने.

**प्र.2)** पुढील तक्ता आकर्षक रीतीने टंकलिखित करा. रकान्याच्या ओळी शाईने आखा. उभा कागद वापरा. दर्शकबिंदू आवश्यक : **[गुण : ३०]**

**वस्तुनिहाय मासिक विक्री दर्शविणारा तक्ता**

| अनु. क्रमांक | वस्तूचे नांव | | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर |
|---|---|---|---|---|---|
| १. | धुलाई यंत्र | .. | २,०२५ | २,७०३ | २,४९९ |
| २. | पंखा | .. | ७,३०५ | ६,२३४ | ५,८९७ |
| ३. | ग्राइंडर | .. | ३,१४० | ३,६२१ | ७,५०४ |
| ४. | रेडिओ | .. | ३२१ | ३४५ | ३३२ |
| ५. | मिक्सर | .. | ४,१३६ | ३,४५६ | ४,६३२ |
| ६. | प्रेशर कुकर | .. | ६,९३१ | ८,२०५ | ५,४१८ |
| ७. | बल्ब | .. | १,५४३ | १,७६५ | ७६५ |
| ८. | फ्रिज | .. | ३,३३३ | ४,५४३ | २,१३५ |